सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र.: विविमं/२०२४–२५/६०५ दिनांक : ०९/०९/२०२४.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक/ मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय : विद्यार्थीकेंद्री इतर पूरक उपक्रम, शिबिरे, कार्यशाळा प्रस्तावाबाबत.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळामार्फत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/ परिसंस्थेत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, निर्भय कन्या अभियान तसेच विद्यार्थी हिताचे अनेक शैक्षणिक, सह शैक्षणिक, उप शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यक्तिमत्व विकास विषयक, कौशल्य प्रशिक्षणपूरक, दिव्यांग धोरणांस अनुकुल आणि इतर बहुविध व कल्याणकारी योजना/उपक्रम विद्यार्थ्यांकरिता राबविले जातात.

आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्था व पदवी/पदव्युत्तर विभागात शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षात विद्यार्थ्यांकरिता **विद्यार्थीकेंद्री इतर पूरक उपक्रम, शिबिरे, कार्यशाळा आयोजित करण्यासाठी प्रस्तावित उपक्रमाचा आराखडा (उद्देश, तज्ञ व्यक्ती, संसाधन व्यक्ती यांची नावे व घेण्यात येणाऱ्या व्याख्यानांचा तपशील) विस्तृत माहिती, तपशील व अनुमानित खर्चासह प्रस्ताव विद्यापीठ संकेतस्थळावर (www. unipune.ac.in – Students' Developement – BOD Online–Login – (User Name & Password) – Students Developement)** येथे ऑनलाईन पद्धतीने सोमवार, दि. ०७ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत प्रस्ताव भरून अपलोड करावेत.

| | तपशील | अपलोड करावयाच्या फाईलबाबत माहिती |
|---|---|---|
| इतर उपक्रम | कला, संस्कृती व साहित्य विषयक सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत प्रायोगिक, केवल, अभिव्यक्त, दृक्‌श्राव्य कला प्रकार, इतर पूरक उपक्रम, शिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, नव उद्योजक शिबिर, लिंगभाव समानता विषयक कार्यशाळा, लेखन कार्यशाळा, नव लेखक शिबिर, दिव्यांग व विशेष व्यक्ती कार्यशाळा, कौशल्य विकास पूरक उपक्रम, नव उद्योजकता तथा व्यवसाय समुपदेशन, व्यक्तिमत्व विकासपूरक समुपदेशन, सांस्कृतिक आदान–प्रदान कार्यक्रम, अभिरूप स्वराज्य संस्था, प्रशासन, संसद, न्यायालय, अशा विषय क्षेत्रांना अनुसरून; विषयाचा परिचय, मार्गदर्शन, प्रशिक्षण, सराव, प्रयोग/अभिव्यक्ती अशा स्तरांचे उपक्रम/कार्यक्रम | प्रस्तावित उपक्रम/कार्यक्रमांचा आराखडा (उद्देश, तज्ञ व्यक्ती, संसाधन व्यक्ती यांची नावे व घेण्यात येणाऱ्या उपक्रम/कार्यक्रमाचे स्वरूप तपशील), उपक्रम/ कार्यक्रमांचा प्रस्तावित दिनांक व आराखडा |

१. महाविद्यालय/परिसंस्था, विद्यापीठ विभागांकडून वरीलप्रमाणे कमाल तीनच (०३) प्रस्ताव सादर करता येतील. **(स्थानिक व तालुकास्तरासाठी प्रत्येकी कमाल २ प्रस्ताव सादर करता येतील तर जिल्हास्तर व विद्यापीठस्तरासाठी प्रत्येकी कमाल १ प्रस्ताव सादर करता येईल परंतु असे सर्व प्रस्ताव मिळून कमाल एकूण ०३ पर्यंतच प्रस्ताव सादर करता येतील.)**

२. इतर पूरक उपक्रम/कार्यशाळा/शिबिरे ही प्राधान्याने एक दिवसीय असावीत.

३. महाविद्यालय/परिसंस्था, विद्यापीठ विभागांकडून वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर विद्यापीठ निर्देशांच्या अधिन राहून कुठल्याही स्तरावर विचाराधीन, अनिर्णित, मान्य, अमान्य अथवा व्यपगत करण्याची/मानण्याची कार्यवाही केली जाऊ शकते.

यानंतर ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेल्या प्रस्ताव अर्जाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेले अर्ज स्कॅन करून तिथेच अपलोड करणे अनिवार्य आहे. त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाकडे ऑनलाईन (**Online**) पद्धतीने अपलोड होणारे प्रस्तावच पुढील प्रक्रियेकरिता विचाराधीन असतील.

सदर प्रस्ताव सोमवार, दि. ०७ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने भरून अपलोड करण्याबाबत संबंधिताना सूचित करण्यात यावे. यानंतर संबंधित लिंक तात्काळ अनुपलब्ध होईल. कळावे, ही विनंती.

ऑनलाईनबाबत अधिक माहिती व मदतीसाठी : ०२०—७१५३३६३३
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०—२५६२२६८०/८१



(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ